20.

# रोकडविरहित व्यवहाराची भारतापुढील आव्हाने

आसोरे बालाजी उत्तम
संशोधक विद्यार्थी, श्री गुरु बुद्धी स्वामी महाविद्यालय पूर्णा [जं]

**सारांश:-** भारत सरकारने पैशाचे विमुद्रीकरण करून देशातील काळा पैसा,भ्रष्टाचारास आळा,बनावट नोटांना आळा, दहशतवाद व नक्षलवाद्यांना मिळणारा टेरर फंड थांबविणे इत्यादी कारणामुळे मोठ्या मुल्याचे चलन काढून घेतले आणि सरकारने रोकड विरहित अर्थव्यवस्थेला चालना दिली रोकडविरहित व्यवहार म्हणजे ज्या ठिकाणी रोख रकमेचा वापर कमी प्रमाणात होणे असा असून डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन देणे होय. तत्कालीन अर्थमंत्र्यांनी असे म्हटले की कॅशलेस म्हणजे 'नो कॅश नव्हे' 'लेस कॅश' अर्थव्यवस्था असे होय. यावरून असे म्हणता येईल की भारत देशात संपूर्ण कॅशलेस अर्थव्यवस्था निर्माण करणे अशक्य आहे. त्यामुळे सरकारची 'लेस कॅश' अर्थव्यवस्था म्हणजे न्यून रोकड अर्थव्यवस्था निर्माण करणे होय. म्हणजेच अर्थव्यवस्थेत सर्व व्यवहार रोख स्वरूपात न होता काही प्रमाणात डिजिटल पद्धतीने व्हावेत. वस्तू व सेवांची खरेदी रोखीने न करता ऑनलाइन पेमेंटच्या मदतीने करणे म्हणजे कॅशलेस होय असे असले तरी भारतीय अर्थव्यवस्थेसमोर कॅशलेस व्यवहार करताना काही आव्हाने येतात. आर्थिक व्यवहार करण्याचा प्रगतशील मार्ग म्हणजे कॅशलेस व्यवहार आहे 'रोखीकडून कमी रोखीच्या अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करणे म्हणजे रोकडविरहित अर्थव्यवस्था असे म्हणता येईल'. सध्याच्या कमी रोख रक्कम वापरण्याच्या किंवा रोख विरहित अर्थव्यवस्थेच्या काळात ऑनलाइन बँकिंग वापरताना ही माहिती महत्त्वाची असते. असे असले तरी कॅशलेस व्यवहाराचा कितीही प्रसार केला तरी अर्थव्यवस्थेत व्यवहारांमध्ये अडथळे निर्माण होतील.

**प्रस्तावना:** ८ डिसेंबर २०१६ रोजी पंतप्रधान यांनी ५०० व १००० रु. च्या नोटा चलनातून बाद करून भ्रष्टाचार, काळा पैसा व्यवहारातून बाहेर काढण्यासाठी पैशाच्या विमुद्रीकरणाचा निर्णय घेतला त्यामुळे मोठे चलन रोख व्यवहारातून बाद केल्याचा परिणाम म्हणजे कॅशलेस व्यवहारास वाव मिळाला कॅशलेस म्हणजे 'नो कॅश नव्हे', 'लेस कॅश' अर्थव्यवस्था असे अर्थमंत्री अरुण जेटली यांनी म्हटले. लेस कॅश अर्थव्यवस्था म्हणजे न्यून रोकड अर्थव्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न आहे.ज्यामध्ये सर्व व्यवहार रोख स्वरूपात न त्यातील काहीसे व्यवहार डिजिटल पद्धतीने होतात.संस्थेत,दुकानात, आस्थापनेत इ.ठिकाणी डिजीटल व्यवहार करणाऱ्यांना प्रोत्साहन देण्याचे धोरण सरकारने आखले.

**कॅशलेस अर्थव्यवस्थेचा अर्थ:** "या अर्थव्यवस्थेत जास्तीत जास्त व्यवहार कार्डने, इलेक्ट्रॉनिक मशीनने डिजिटल होतो त्या अर्थव्यवस्थेस रोकडविरहित अर्थव्यवस्था(Cashless Economy ) असे म्हणतात". अरोखीच्या व्यवहाराच्या दिशेने वाटचाल करताना डिजिटलायझेशन व्यवहार हा महत्त्वपूर्ण मार्ग असून कॅशलेस अर्थव्यवस्थेकडे वृद्धी करण्यासाठी इलेक्ट्रॉनिक मशीनच्या वापराला प्रोत्साहन द्यावे लागेल. उपभोक्ता उपभोग घेत असलेल्या वस्तू व सेवाचा विनिमय रोख पैशाचा वापर न करता इलेक्ट्रॉनिक किंवा डिजिटल माध्यमाने व्यवहार पूर्ण करणे त्याला रोकडविरहित (Cashless) व्यवहार म्हणतात. डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, नेट बँकिंग, ऑनलाइन व्यवहार इ. बँकिंग, चेक्स, तसेच यूपीआय, प्रीपेड वॉलेट, युएसएसडी, इनेबल्ट पेमेंट, पी.ओ.एस मशीन, वॉलेट पेपर इ. द्वारे कॅशलेस व्यवहाराच्या वापरात वृद्धी करणे भारतीय अर्थव्यवस्था रोकडविरहित अर्थव्यवस्था तयार करणे हा विमुद्रीकरणाचा मुख्य उद्देश असल्याचे दिसून येते. संपूर्णपणे रोकडविरहित अर्थव्यवस्था असणारा एकही देश आज जगात नाही कॅशलेस व्यवहाराचा अधिकाधिक वापर करणाऱ्यांमध्ये प्रगत राष्ट्राचा समावेश असला तरी मुख्यतः डेन्मार्क, नॉर्वे, स्वीडन हे राष्ट्र वेगाने रोकडविरहित अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करत आहेत. नो कॅश पद्धतीने व्यवहार करणारे बेल्जियम प्रथम राष्ट्र असून 93% व्यवहार कॅशलेस करते तसेच फ्रान्स 92%, कॅनडा 90%, ब्रिटन 89% स्वीडन89%, ऑस्ट्रेलिया 86%, नेदरलँड 85%, अमेरिका 80%, जर्मनी 76%, दक्षिण कोरिया 70% तर भारतात मात्र अद्यापी हे प्रमाण अवघे 3% कॅशलेस स्वरूपात व्यवहार करण्याचे दिसून येते. म्हणजेच 97% व्यवहार रोखीने होताना दिसतात हे प्रमाण कमी करण्यासाठी भारताला महाप्रयत्न करावे लागणार आहेत.

Estd.1983
PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani



Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Scanned with OKEN Scanner

वित्त मंत्री निर्मला सीतारामन यांनी 2022 च्या बजेट भाषणात जाहीर केलेल्या घोषणात भारतीय रिझर्व बँक (RBI) आर्थिक वर्ष 2022-23 मध्ये स्वतःचा डिजिटल रुपया लॉन्च करणार आहे हा डिजिटल रुपया मध्यवर्ती बँकेचे डिजिटल चलन आहे सेंट्रल बँक डिजिटल करन्सी ची ओळख डिजिटल अर्थव्यवस्थेला कशी महत्त्वपूर्ण चालना देईल यावर विस्ताराने त्यांनी भाष्य केले.

उद्दिष्टे:-

१) भारतातील रोकडेविरहित अर्थव्यवस्थेच्या अडथळ्याचा अभ्यास करणे.

२) भारतातील ग्रामीण व शहरी क्षेत्र सर्वांना कॅशलेस अर्थव्यवस्थेकडे वळवणे.

३) कॅशलेस व्यवहारास अधिकाधिक आर्थिक साक्षरता करणे.

संशोधन पद्धती:-

सदरील अभ्यास हे विश्लेषणात्मक संशोधन आहे हे संशोधन प्रामुख्याने दुय्यम सामग्री आधारलेले आहे ही दुय्यम सामग्री प्रामुख्याने वेगवेगळे अर्थशास्त्राचे ग्रंथ, पुस्तके, मासिके, वर्तमानपत्र इ. माध्यमातून जमावलेली सामग्री आहे.

**रोकडविरहीत अर्थ्यवस्थेची भारतातील आव्हाने:-**

भारतामध्ये कॅशलेस पेमेंट प्रणाली सुरू करण्यासमोर अनेक आव्हाने आहेत ते पुढीलप्रमाणे.

**१)कॅशलेस व्यवहारांमध्ये प्रगती नाही:-**

सद्यस्थितीचा विचार करता कॅशलेस च्या व्यवहारात पाहिजे तेवढ्या प्रमाणात प्रगती झालेली नाही. कारण क्रेडिट अथवा डेबिट कार्डाचा ई-बँकिंग इ. चा वापर करून वस्तू व सेवांच्या खरेदी देयकांचा भरणा यांचा रोकडविरहित व्यवहारात मुख्यतः समावेश करावा लागेल मात्र यात वृद्धीच्या मात्रेत वाढ झालेली निदर्शनास येत नाही. कारण लोकांच्या मनात असलेली भीती त्यामुळे जनता कार्डस किंवा ई-बँकिंग चा वापर करून व्यवहार करू शकत नाहीत.

**२) सायबर सुरक्षा समस्येचा आभाव:-**

कॅशलेस अर्थव्यस्थेमधील आणखी एक वाढणारे आव्हान म्हणजे सायबर सुरक्षा समस्या आहे. संपूर्ण अर्थव्यवस्थेत आपल्या रोकडविरहित व्यवहार खात्यावर अवैधरित्या हॅकर्स काही क्षणातच नियंत्रण मिळवितात. हॅकर्स लोकांची ऑनलाइन फसवणूक, दुसऱ्याच्या खात्यातून पैसे परस्पर लंपास करणारे सायबर चोर निर्माण होईल हे हॅकर्स विविध पद्धतीचा अवलंब करून लोकांची फसवणूक करतात आणि लोकांना वेगवेगळे अमित व प्रलोभने दाखवून गोपनीय माहिती मिळवण्याचा प्रयत्न करतात आणि वेगवेगळे मेसेज करून त्यांच्याकडून पासवर्ड घेऊन त्यांच्या खात्यातील रक्कम लंपास करतात. सायबर गुन्ह्याच्या संख्येत वाढ हे रोकडविरहित अर्थव्यवस्थेसमोर मोठे आव्हान आहे सायबर क्राईम करून फसवेगिरीत वाढ होण्याची शक्यता असते.

**३)डिजिटल व्यवहारासाठी नेटवर्क कनेक्टिव्हिटी आणि इंटरनेट जोडणी आवश्यक:-**

भारतात सर्व ठिकाणी इंटरनेटचे जाळे नसून ग्रामीण भागात अल्प इंटरनेट जोडण्या आहेत. तसेच यांच्या जोडीला गरिबी आणि अशिक्षितता या समस्या आहेत कॅशलेस अर्थव्यवस्थेत आर्थिक व्यवहाराची अंमलबजावणी होण्यास इंटरनेटचे जाळे सर्वदूर असणे आवश्यक आहे. तसेच लोकांची कम्प्युटर साक्षरता कमी असल्यामुळे त्यांना देवाण-घेवाण करण्यासाठी इलेक्ट्रॉनिक पद्धतीचा वापर करता येत नाही अशा अनेक समस्यामुळे प्लास्टिक मनीच्या व्यापक व्यवहारावर मर्यादा येत आहेत. तसेच भारतात रोकडविरहित व्यवहार करण्यासाठी लागणारी सुविधा उपलब्ध नाही. अशामुळे डिजिटल व्यवहारासाठी इंटरनेट व नेटवर्क कनेक्टिव्हिटीचे आव्हान भारतापुढे निर्माण होते.

**४) ग्रामीण क्षेत्रात अल्प साक्षरता दर:-**

कमी साक्षरता दर हा रोकडविरहित अर्थव्यवस्थेपुढे आव्हानात्मक प्रश्न आहे. कारण भारत देशातील ग्रामीण भाग अल्प साक्षर आहे याचा परिणाम बँकिंग सेवांच्या सुलभतेत अडथळा आणतो. त्यामुळे कॅशलेस व्यवहाराचा फायद्याचा आनंद घेण्यासाठी देशातील लोकांना

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani



Scanned with OKEN Scanner

थोडेफार लिहिता वाचता येणे हे नसून त्यांना डिजिटल व्यवहारात साक्षरता असणे आवश्यक आहे. कॅशलेस अर्थव्यवस्थेत वळवण्यासाठी सरकारला अनेक प्रयत्न करावे लागतील.

**५)उच्च रोख बाळगणे:-**

भारतीय अर्थव्यवस्था ही विकसनशील आहे त्यामुळे देशाचा आर्थिक विकास होत आहे डिजिटल व्यवहार करताना लोकांना कॅशलेस व्यवहाराबद्दल असलेली असुरक्षितता यामुळे नागरिक उच्च रोख स्वतः जवळ बाळगून वस्तू व सेवांचा विनिमय व्यवहार रोखतेच्या माध्यमातून करतात. भारतीयांचा उद्देश हा प्रामुख्याने रोखीने पैसे काढून आर्थिक व्यवहार करण्याचा आहे. मुख्यतः 95% व्यवहार ग्रामीण भागात रोखीने केला जातो फार मोठ्या प्रमाणातील असंघटित क्षेत्रातील रोजगार हा रोख रूपात दिला जातो यामुळे रोख रक्कम बाळगून ते रोख स्वरूपात व्यापार करतात. अशी उच्च रोखता अवलंबित्व करणाऱ्याचे प्रमाण कमी करणे भारतासमोर एक आव्हानच आहे

**६) ग्रामीण भागात बँकिंग सुविधांचा अभाव:-**

भारतात सद्यस्थितीत देखील कित्येक ग्रामीण भागात बँक सुविधा पोहोचल्या नाहीत हा भारतासमोर आव्हानात्मक प्रश्नच आहे असे असले तरी कोट्यावधी जनतेची बँकांमध्ये खाते देखील नाहीत खाते असली तरी त्या खात्यावर व्यवहार केला जात नाही ग्रामीण भागातच काय शहरी भागातही अशीच परिस्थिती पाहण्यास मिळते त्यामुळे जितक्या बँका तितकी रोख रक्कम खात्यात जमा होईल. अशा प्रकारे आर्थिक साक्षरता करून बँकांनी लोकांना प्लास्टिक कार्डाची प्रक्रिया, त्याचा वापर आणि त्यामुळे होणारे फायदे शिकविण्यासाठी मदत करावी जेणेकरून कॅशलेस व्यवहार करण्यासाठी चालना मिळेल.

**७) डिजिटल आधारभूत सुविधांचा अभाव:-**

कॅशलेस अर्थव्यवस्थेच्या विकासात पायाभूत सुविधांचा अभाव हा मोठा अडथळा आहे. खराब इंटरनेट कनेक्टिव्हिटी, खराब डिजिटल पायाभूत सुविधा, अकार्यक्षम बँकिंग प्रणाली दुर्गम भागात एटीएम चा अभाव इत्यादी ई-बँकिंग व्यवहारातील वाढ करण्यासाठी बँका पूर्णपणे कार्यतत्पर असणे आवश्यक डिजिटल अर्थव्यवस्थेची प्रमुख गरज म्हणजे इंटरनेट तसेच स्मार्टफोन आहे अशा अनेक समस्या डिजिटल व्यवहारासाठी पायाभूत सुविधा पुरविण्यास अक्षम आहेत.

**८) आर्थिक साक्षरतेचा अभाव:-**

भारतासमोर असलेला हा एक लागते. डिजिटल व्यवहाराबद्दल असलेली भीती लोकांची संतुष्टात यावी आणि त्यांना डिजिटल व्यवहार करण्यासाठी आर्थिक साक्षर करावे ज्यामुळे ते कॅशलेस व्यवहारात येऊ शकतील याकरिता विविध उपाय योजना सुरू केल्या त्यातील गरिबाकरिता शून्य रकमेची खाती हे महत्त्वाचे पाऊल आहे असे असले तरी सुमारे 93% ग्रामीण भागातील लोकांकडे डिजिटल व्यवहार करण्याची क्षमता नाही यासाठी सरकारने हा अभाव भरून काढा .

**९} महागड्या स्वाईप मशीन्स:-**

डिजिटल अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी महत्त्वाचा भाग म्हणजे स्वाईप मशीन आहे या स्वाईप मशीन श्रीमंत दुकानदारांनाच घेणे परवडतात तर सामान्य किराणा विक्रेत्यांना ऑटो ड्रायव्हर अनेक दुकानदार अनेक रस्त्यावरील विक्रेते इत्यादी अशा सामान्य विक्रेत्यांना महागड्या स्वाईप कार्ड मशीन घेऊन ऑनलाईन व्यवहार करणे अपेक्षित नाही तसेच या व्यवहारांसाठी त्यांना उत्पन्नापेक्षा खर्च जास्त करावा लागेलं. आणि अशा मशीन्स परवडेल अशी अपेक्षा केली जाऊ शकत नाही तसेच अनेक दुकानदार रस्त्यावरील अनेक विक्रेते यांना स्वाईप मशीन कशी वापरायची हेच माहित नसल्याने ते डिजिटल व्यवहार कसे करू शकतील.

**१०) आर्थिक समावेशकता:-**

रोकडविरहित अर्थव्यवस्थेसाठी आर्थिक समावेशकता हा प्रश्न महत्त्वपूर्ण आहे. आर्थिक समावेशकता म्हणजे देशातील लोकांना अर्थव्यवस्थेमध्ये सामावून घेऊन त्यांना देशाच्या अर्थव्यवस्थेचा भाग बनवला पाहिजे बँका तसेच वित्तीय संस्थेमध्ये त्यांची खाती उघडून



Co-ordinator IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)
Estd.1983
PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani
Scanned with OKEN Scanner

लोकांना आर्थिक व्यवस्थेत आर्थिकदृष्ट्या सामावून घेतले जावे अजूनही मोठ्या प्रमाणात लोकांची बँक खाते नाहीत तसेच असली तरी त्यांना क्रेडिट कार्ड, एटीएम कार्ड, ऑनलाइन पेमेंट इत्यादी बाबींचा वापर करता येत नाही अशांना आर्थिक व्यवस्थेत सामावून घ्यावे.

### ११) भाषेची अडचण:-

भारतातील सामान्य ग्राहकांना किंवा उपभोक्त्यांचा विचार करता सुमारे 60 ते 70% लोकांना इंग्रजी भाषेचे ज्ञान नसल्याने त्यांच्यापुढे समस्या निर्माण होते. जसे इंटरनेट इंग्रजी भाषेवर आधारित असल्याने तसेच प्लास्टिक कार्ड वरील तपशीलही इंग्रजीत असल्यामुळे व्यवहार करताना मोबाईलवर येणारा संदेशही इंग्रजीत येतो म्हणून अशी व्यवहाराची प्रक्रिया करताना त्यांना अनेक अडचणी निर्माण होतात त्यामुळे अशा प्रक्रिया करताना अनेक भाषा वापरणे महत्त्वाचे असून प्रत्येकाला इंग्रजीचे थोडेफार ज्ञान असणे डिजिटल व्यवहारासाठी गरजेचे असते.

### १२) डिजिटल साक्षरता नाही:-

ग्रामीण भागातील लोकांना अजून स्मार्टफोन हाताळण्याची माहिती नाही त्यामुळे देशातील बहुतांश लोकांना संगणक कसा वापरायचा अजूनही अवगत नाही याशिवाय इंटरनेट सुविधेचा अभाव तिथे आहे आणि त्यामुळे देश कॅशलेस कसा होऊ शकेल असे असले तरी अजूनही काही ग्रामीण शहरी भागात 2G नेटवर्क उपलब्ध होणे खुप कठीण आहे शिवाय विकसित देशाच्या तुलनेत इंटरनेट प्रवेशाची किंमत खूप जास्त आहे.

### निष्कर्ष:-

1. डिजिटल व्यवहार पेमेंटला प्राधान्य देताना लोकांना आर्थिक सुरक्षितता प्रदान करावी.
2. कमी रोख रकमेचा वापर करण्यासाठी डिजिटल व्यवहारात अधिक पारदर्शकता व स्वच्छ आर्थिक वाढ असावी.
3. शाळा, महाविद्यालय, पंचायती, प्रशासकीय व्यवस्था इत्यादी मार्फत कॅशलेस व्यवहाराबद्दल जागृती करावी
4. भारतीय अर्थव्यवस्थेला अधिक गतिमान व वृद्धिमान करण्यासाठी कॅशलेस व्यवस्थेत जाचक उपाय करावे लागतील.
5. डिजिटल व्यवहार करताना ॲपद्वारे केलेल्या व्यवहाराबद्दल लोकांमध्ये असलेली आर्थिक अस्थिरता सरकारने दूर करावी.
6. डिजिटल गुन्ह्यामुळे सामान्य जनतेचा पैसा गेला तर त्याला भरपाई दिली जावी किंवा डिजिटल तपास व इन्शुरन्सची व्यवस्था निर्माण करावी
7. कॅशलेस व्यवहार करताना अनेक भाषांचा वापर करावा ज्यामुळे व्यवहार करणाऱ्यास सुलभता निर्माण होईल.
8. कॅशलेस अर्थव्यवस्था विकसित होण्यासाठी शिक्षणाचे प्रमाण जास्त तीव्रतेने वाढावे.

### संदर्भसूची:-


१) डॉ. सुरेश पाटील/डॉ. ललित तायडे- 'मूलभूत पब्लिकेशन्स-२०१७.

2) 'योजना'-योजना मासिक- फेब्रुवारी 2017

३) महाराष्ट्र टाइम्स न्यूजपेपर- डिसेंबर २०१६.

४) प्रतियोगिता दर्पण- भारतीय अर्थव्यवस्था.

५) www.google.co.in. या संकेत स्थळांचा संदर्भ.


□□□

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

Scanned with OKEN Scanner